# DEPARTMENT
# OF
# SOCIOLOGY
# 2024-2025

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE ★ KOLHAPUR

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE ★ KOLHAPUR



प्रा. डॉ. जाधव एम. ए.

समाजशास्त्र विभाग प्रमुख

प्रा. डॉ. गावडे ए. ए.

2024-25

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE ★ KOLHAPUR



दि २०/०६/२०२४

# नोटीस

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रातील समाजशास्त्र विभागाची बैठक 'सोम' वार दिनांक ७ जुलै २०२४ रोजी समाजशास्त्र विभागात ठिक ४.०० वाजता बैठक आयोजित केली असून बैठकीस आपण उपस्थित रहावे.

सदर बैठकीमध्ये खालील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येत आहे.

• बैठकीपुढील विषय •

१. महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेकडे लक्ष देणे
२. विद्यार्थी संख्या महाविद्यालयात वाढविण्या संदर्भात चर्चा करणे.
३. सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात समाजशास्त्र विभागाचे वार्षिक नियोजन करणे.
४. प्रथम सत्रातील सेमीनार व ~~[illegible]~~ संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देणे.

कळावे

समाजशास्त्र विभाग प्रमुख

• नोटीस मिळाल्याची पोहच •

प्रा. डॉ. जाधव एम. ए. — Jadhav

प्रा. डॉ. गावडे ए. ए. — [signature]

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE KOLHAPUR



दि.०१/०७/२४

# बैठक वृत्तांत

सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रातील प्रथम सत्रातील समाजशास्त्र विभागाची बैठक सोमवार दिनांक ०१/०७/२०२४ रोजी समाजशास्त्र विभागात ठिक ४.०० वाजता आयोजित केली होती.

सदर बैठकीस खालील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

विषय क्रमांक : १

महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेकडे लक्ष देणे

ठराव क्रमांक : १

जुन ते ऑगस्ट महिन्यात पाऊस असल्याने बाहेर गावच्या खेड्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास त्रास होतो. विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी आल्यावर त्यांना त्याच्या कागदपत्रा अभावी म्हणजेच उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, शेरांकन, ईबीसी फॉर्म या कागदपत्रांपैकी अभावी एक दोन कागदपत्रे नसली तर प्रथम त्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन राहिलेले कागदपत्रे नंतर घेण्यात यावी अशी सूचना प्रा.डॉ. जाधव एम.ए. यांनी मांडली. सदर सूचनेस प्रा.डॉ. गावडे ए.ए. यांनी मान्यता दिली.

सुचक - प्रा. डॉ. जाधव एम.ए.
अनुमोदन - प्रा. डॉ. गावडे ए.ए.

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE ★ KOLHAPUR



विषय क्रमांक : २

महाविद्यालयात विद्यार्थी संख्या वाढविण्या संदर्भात चर्चा करणे.

ठराव क्रमांक : २

महाविद्यालयात प्रवेशील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी मित्रमंडळीत नातेवाईकांना विद्यार्थी पाठविण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच आपण रहात असलेल्या जवळच्या शाळा आहे तेथे प्रत्यक्ष भेटून मुख्याध्यापकास भेटून नाइट कॉलेजचे महत्व समजावून सांगून विद्यार्थ्यांना प्रेरीत करुन प्रवेशा संदर्भात सविस्तर माहिती सांगण्याचे ठरले.

महाविद्यालयातील सुविधा ग्रंथालय बी.ए. भाग ३ मधील स्पेशल विषयाचे महत्व सांगण्याचे ठरले. ह्येणे करुन महाविद्यालयात विद्यार्थी संख्या वाढेल या संदर्भात सविस्तर चर्चा प्रा-डॉ- गावडे यांनी केली.

त्यास प्रा-डॉ जाधव यांनी मान्यता दिली.

सूचक - प्रा डॉ. गावडे ए.ए.

अनुमोदन - प्रा-डॉ. जाधव एम.ए.

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE ★ KOLHAPUR



विषय क्रमांक: ३

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक सत्रात समाजशास्त्र विभागाचे वार्षिक नियोजन करणे.

ठराव क्रमांक: ३

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक सत्रात समाजशास्त्र विभागाचे वर्षभर कोणकोणते उपक्रम राबवायचे या संदर्भात सखोल चर्चा होऊन खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्याचे ठरले.

रक्षाबंधन निमित्त रिमांडहोम बालसुधार गृह केंद्रातील मुलांना राखी बांधण्याचे नियोजन करण्याचे ठरले. महाविद्यालयात तज्ञ मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्याचे ठरले. ज्यामुळे समाजशास्त्र विषयातील वेगवेगळे विचारप्रवाह, सिद्धांत यांची विद्यार्थ्यांना माहिती होईल. वृक्षारोपण करणे, वृद्धाश्रमास भेट देणे, कष्टकऱ्यांना फळवाटप कार्यक्रम, शिवाजी विद्यापीठ ग्रंथालयास भेट, जागतिक चिमणी दिन निमित्त २२ मार्च रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील पक्षांना पाणी पिण्यासाठी मडके बांधण्याचे ठरले.

सूचक – प्रा. डॉ. जाधव एम.ए.
अनुमोदक – प्रा. डॉ. गावडे ए.ए.

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE ★ KOLHAPUR



विषयक्रमांक: ४

प्रथम सत्रातील 'सेमीनार' संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देणे.

ठराव क्रमांक: ४

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात बी.ए. भाग ३ मधील विद्यार्थ्यांसाठी सेमीनारची तयारी कशी करावी यावर सविस्तर चर्चा झाली. सेमीनार विद्यार्थ्यांनी दिल्यावर त्याचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवणे.

जे विद्यार्थी सेमीनारला उपस्थित राहतील त्याच विद्यार्थ्यांना सेमीनारचे मार्क्स देणे. जे विद्यार्थी सेमीनारला अनुपस्थित राहतील त्यांना अनुत्तीर्ण करण्याचे ठरले.

सेमीनारला सर्व विद्यार्थी उपस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांना फोन करुन उपस्थित करण्याचे ठरले. असे मत प्रा.डॉ. गावडे ए.ए. यांनी मांडले

सदर ठरावास मान्यता प्रा.डॉ. जाधव एम.ए. यांनी दिली.

सूचक — प्रा.डॉ. गावडे ए.ए.
अनुमोदन — प्रा.डॉ. जाधव एम.ए.

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE KOLHAPUR



दि. ११/११/२०२४

# नोटीस

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील दुसऱ्या सत्रामधील 'समाजशास्त्र विभागाची बैठक मंगळवार दिनांक १२.११.२०२४ रोजी समाजशास्त्र विभागात सकाळ. ८.०० वाजता आयोजीत केली असून या बैठकीस उपस्थित रहावे.

सदर बैठकीत पुढील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येईल.

• बैठकी पुढील विषय •

१. मागील बैठकीचे प्रोसिडींग वाचून कायम करणे

२. विद्यार्थ्यांना संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे

३. वार्षिक नियोजनानुसार विद्यार्थ्यांना दुसऱ्या सत्रात प्रोजेक्टची माहिती सांगणे

४. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे नियोजन करणे

कळावे
समाजशास्त्र विभाग प्रमुख

• नोटीस मिळाल्याची पोहच •

१. प्रा.-डॉ. जाधव एम. ए. Jadhav
२. प्रा.-डॉ. गावडे ए. ए. Gawade

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE KOLHAPUR

Page No.
Date: / /

दि १२/११/२०२४

# बैठक वृत्तांत

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील दुसऱ्या सत्रामधील समाजशास्त्र विभागाची मंगळवार दिनांक १२.११.२०२४ रोजी बैठक समाजशास्त्र विभागात सकाळी ८.०० वाजता घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील विषयावर चर्चा करण्यात आली

विषय क्रमांक: १.

मागील बैठकीचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

ठराव क्रमांक: १ प्रा. डॉ. गावडे ए. ए. यांनी मागील बैठकीचे प्रोसिडींग सविस्तर वाचून दाखविले. त्या ठरावास मा. डॉ. जाधव एम. ए. यांनी तात्काळ मान्यता देवून ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सूचक - प्रा. डॉ. गावडे ए. ए.

अनुमोदन - प्रा. डॉ. जाधव एम. ए.

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE
KOLHAPUR



विषय क्रमांक : 2
विद्यार्थ्यांना संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे.

ठराव क्रमांक : 2
महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधन म्हणजे काय? हे सांगुन विद्यार्थ्यांच्या अंगी संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देणे. यामध्ये मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची चे स्वरूप, फायदे व तोटे या विषयीची इतंभूत माहिती देण्याचे ठरले.

बी.ए. भाग 3 मधील विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड निर्माण करणे. त्यामुळे ते एम.ए. साठी विद्यापीठात प्रवेश घेतील व संशोधन करण्यास सुरुवात करतील ही अपेक्षा.

त्याच प्रमाणे वर्तमानपत्रातील मासिकामधील संशोधनपर लेख यांची कात्रणे दाखवुन त्याचे महत्व समजावुन विद्यार्थ्यांना सांगण्याचे ठरले.

सुचक - प्रा. डॉ. जाधव एम.ए.

अनुमोदन - प्रा. डॉ. गावडे ए.ए.

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE
KOLHAPUR



विषय क्रमांक : ३

वार्षिक नियोजनानुसार विद्यार्थ्यांना दुसऱ्या सत्रात प्रोजेक्टची माहिती सांगणे.

ठराव क्रमांक : ३

सन २०२४-२५ या प्रथम सत्रात सेमीनारची सविस्तर माहिती देण्यात आली होती. दुसऱ्या सत्रात शिवाजी विद्यापीठाच्या नियमनानुसार 'प्रोजेक्ट' विद्यार्थ्यांनी करावयाचे आहेत. सदरचा प्रोजेक्ट कसा लिहावा. त्यामध्ये अनुक्रमणिका प्रास्ताविक, उद्देश, संशोधनाची गरज, पद्धत, मर्यादा, अभ्यासाचे क्षेत्र, शेवटी निष्कर्ष लिहून त्यानंतर शेवटी संदर्भ ग्रंथ लिहिणे आवश्यक आहे.

अशा प्रकारची प्रोजेक्टची माहिती इत्थंभूत स्वरूपात प्रा. डॉ. गावडे यांनी दिली. त्यास प्रा. डॉ. जाधव यांनी मान्यता दिली.

सूचक - प्रा. डॉ. गावडे ए. ए

अनुमोदन - प्रा. डॉ. जाधव एम. ए.

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE * KOLHAPUR

Page No.
Date: / /

विषय क्रमांक : ४

शैक्षणिक सहलीचे योग्य नियोजन करणे

ठराव क्रमांक : ४

स
समाजशास्त्र विभागाच्या बैठकीत विभागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढण्याचे निश्चित केले. आपल्या नाइट कॉलेजचे विद्यार्थी दिवसभर कामकरून शिक्षण घेत असतात. आमचे विद्यार्थी विविध ठिकाणी प्रमाणी कामे करून सैध्याकाळी कॉलेजला येतात.
रविवार म्हणजे त्यांचा सुट्टीचा दिवस असतो त्यामुळे रविवारचीच सहल काढण्याचे ठरले. जेणे करून शैक्षणिक नुकसान विद्यार्थ्यांचे होऊ नये म्हणून रविवारचा दिवस ठरवला जावा अशी सूचना प्रा.डॉ. जाधव एम. ए. यांनी दिली.

सुचक - प्रा. डॉ. जाधव एम. ए.

अनुमोदन - प्रा. डॉ. गावडे ए. ए

Scanned with OKEN Scanner